# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :४६०/२०२२ दिनांक :- १६/०३/२०२२.

**तक्रारदार यांचे** वैयक्तिक माहितीचा (आधारकार्ड व फोटो) गैरवापर करुन वोडाफोन पोस्टपेड मोबाईल क्रमांक ॲक्टीव्ह करुन देणा-या मोबाईल गॅलरीधारकास अटक केल्याबाबत.

**- सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी**

दिनांक २८/०२/२०२२ रोजी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आला होता. सदर तक्रारी अर्जामध्ये तक्रारदार यांनी त्यांचे नावे कोणीतरी अज्ञात व्यक्ती वोडाफोन मोबाईल क्रमांक वापरत असुन त्याचे बिल भरण्याकरीता त्यांना कस्टमर केअर तसेच रिकव्ही एजंट करुन त्रास होत असल्याने तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिला. सदरची तक्रार प्राप्त होताच सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ कारवाई करीत तक्रारदार यांचेकडे व संशयीत वोडाफोन क्रमांकाबाबत अधिक चौकशी केली.

सदर चौकशी दरम्यान तक्रारदार यांनी त्यांची वैयक्तिक कागदपत्रे कोठे दिल्याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी काही दिवसांपुर्वी त्यांचे वापरते वोडाफोन मोबाईल क्रमांक पोस्टपेडमधुन प्रिपेड करण्याकरीता मिरारोड रेल्वे स्टेशन जवळील Vodafone Mini Store Vcare-2 वोडाफोन-आयडीया मिनी स्टोर गॅलरी येथे त्यांचे आधारकार्ड व फोटो दिले होते असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचे नावे असलेल्या संशयीत माबाईल क्र. ९८१९८२४१२१ चालु करण्यात आलेल्या माहितीबाबत अधिक चौकशी करण्यात आली. सदर चौकशी दरम्यान तक्रारदार यांचे कागदपत्राचा गैरवापर करुन नमुद गॅलरीत काम करणारा इसम हा तक्रारदार यांचे नावे ९८१९८२४१२१ हा मोबाईल क्रमांक वापरत असल्याचे निषप्न्न झाले आहे. उपरोक्त तक्रारी अर्जाचे अनुषंगाने Vodafone Mini Store Vcare-2 वोडाफोन-आयडीया मिनी स्टोर गॅलरी येथे काम करणारे संशयीत आरोपी क्र.१) वय २९ वर्षे व क्र २) वय १९ वर्षे यांना नयानगर पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन सदरबाबत नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं १७८/२०२२ भादविस कलम ४१९,४२०,३४ प्रमाणे दिनांक १५/०३/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपली वैयक्तिक कागदरपत्रे कोणासही विनाकारण देवु नये. आपले नावावरील कागदपत्रांचा वापर करुन व त्यावर वरील प्रमाणे मोबाईल क्रमांक/बँक खाते इत्यादी चालु करुन इतर नागरीकांची फसवणुक करण्याकरीता वापरण्यात येण्याची शक्यता आहे. तसेच आपल्या नावावर किती मोबाईल सिम कार्यरत आहे याची माहिती खालील वेब पेजवर भेट देवुन तपासणी करुन घ्यावी. तसेच आपल्या नावावर अनाधिकृत सिम क्रमांक दिसत असल्यास तो तात्काळ बंद करुन घ्यावा.

https://tafcop.dgtelecom.gov.in/index.php

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री.सुजितकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, श्री.प्रसाद शेनोळकर, पोउनि/सायबर क्राईम सेल, श्री.गणेश इलग, पोशि/सायबर क्राईम सेल, मपोशि/सुवर्णा माळी, सायबर क्राईम सेल, मपोशि/ माधुरी धिंडे, सायबर क्राईम सेल यांनी केलेली असुन खाजगी सायबर तज्ञ श्री. निशीत शाह यांनी तांत्रिक माहितीचे विश्लेषण करुन सहकार्य केले आहे.

----